# मराठी अभ्यास केंद्र

## श्वास मराठीचा... ध्यास महाराष्ट्राचा

(नोंदणी क्रमांक - महा/६९४/०९/ठाणे, विश्वस्त संस्था नोंदणी क्रमांक : एफ/१८५०१/ठाणे)
द्वारा : डॉ. दीपक पवार, डी ३०२, त्रिवेणी, लक्ष्मीनगर म्हाडा कॉलनी, घाटकोपर (पू.) मुंबई - ४०० ०७५
ई-पत्ता : marathipalaksammelan2017@gmail.com

दि. २२ ऑगस्ट, २०१९

### सहयोग पत्र

मराठी विभाग, रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालय ( स्वायत्त), घाटकोपर आणि मराठी अभ्यास केंद्र यांनी संयुक्तपणे पुढील दोन वर्षांसाठी (२०१९-२० आणि २०२०-२१) सहयोग संबंध प्रस्थापित करण्याविषयक हे पत्र आहे. मराठी विभागातील विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसन, मराठी भाषा, समाज आणि संस्कृतिविषयक संशोधन, तसेच मराठीसंबंधित इतर उपक्रम या संदर्भात दोन्ही विभाग सहयोगाने काम करतील.

महाराष्ट्र सरकारच्या आदेशांनुसार मराठी टंकलेखनाच्या प्रमाणीकरणासाठी युनिकोड फॉंट्सचा वापर करणे आवश्यक आहे. या सहयोग संबंधांतर्गत मराठी अभ्यास केंद्राच्यावतीने युनिकोड मराठी टंकलेखनाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येईल. मराठी अभ्यास केंद्राच्या भाषाविषयक उपक्रमांमधे व संशोधनप्रकल्पांमधे विद्यार्थी सहभागी होऊन संशोधनाचा अनुभव घेतील.

रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालयातील मराठी विभाग, विद्यार्थी व मराठी भाषा आणि संस्कृतीच्या विकासात हे सहयोग संबंध योगदान देतील हा विश्वास वाटतो.

| डॉ. उषा मुकुंदन | डॉ. स्नेहा देऊस्कर | डॉ. दीपक पवार |
|---|---|---|
| प्राचार्या | मराठी विभाग प्रमुख | मराठी अभ्यास केंद्र |